प्रेसनोट

जा.क्र. ४९० /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः— ०४ / ०७ /२०१७

# 'वाहतूक समन्वय समितीची बैठक'

भंडारा :— दिनांक ०४/०७/२०१७ रोजी ११.३० ते १३.०० वा दर. जिल्हा प्रवासी वाहतुक समन्वय समीती समन्वये समितीची बैठक पोलीस अधिक्षक भंडारा भंडारा श्रीमती विनीता साहू यांचे अध्यक्षतेखाली पोलीस मुख्यालय भंडारा येथे पार पडली सदर बैठकीस उपप्रादेशीक परीवहन अधीकारी झाडे विभागनियंत्रक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, भंडारा पोलीस निरीक्षक श्री गाडे , डेप्युटी सि.वो. श्री नगरपरीषद भंडारा व श्री गायधने अॅटो चालक मालक संगघटना भंडारा हे विशेष नियंत्रित सदस्य म्हणुन उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये पोलीस अधिक्षक भंडारा श्रीमती विनीता साहू यांनी वाहनामध्ये अवैधरित्या लावलेल्या गॅसकिट तपासनी मोहीम राबवावी, तसेच अवैध प्रवासी वाहतुकीस आळा बसविण्यासाठी पोलीस व आर.टी.वो विभागाने विशेष मोहीम राबवावी प्रवाशांच्या सुरक्षितेकरीता सर्व ऑटो रिक्षा चालकांनी गनवेष परिधान करावा व सोबत त्यांचे लायसेन्स बॅच बाळगावी तसेच ऑटोमध्ये प्रवाशांना दिसेल अशा पध्दतीने नाव,पत्ता मोबाईल नंबर तसेच अॅटोचा रजिष्ट्रेशन क्र. ई तपसील असलेली स्टिकर चिकटवावीत अशा सुचना उपस्थित सदस्यांना दिल्या.

तसेच नुकत्याच शाळा सुरू झाल्या असल्याने विदयार्थी वाहतुक करणाऱ्या स्कुलबस / अन्य मोटार वाहने ही नियमानुसार आहेत काय याची तपासनी/कारवाही करण्याचे आदेश दिले.तसेच रस्त्यावरील वाहतुकीचे नियत्रंन व नियमन करने सुलभ व्हावे, याकरीता शहरातील महत्वाच्या चौकांमध्ये सिग्नल उभारली जाणार असुन, त्याबाबतची कार्यवाही सिघ्रगतीने करण्याबाबत नगरपरीषद प्रतिनिधींना सुचना दिल्या.

मोटार वाहनाच्या हॅर्नमुळे होणारे ध्वनी प्रदुषनास आळा घालण्यासाठी, अनावश्यक व कर्ण कर्कस हॉर्न वाजविनाऱ्या मोटार वाहनावर कार्यवाही करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले असुन, दिंनाक ०१ जुलै ते ३१ जुलै २०१७ पासुन 'अॅन्टी हॉन्कींग ड्राईव्ह' आर.टी.ओ. व पोलीस विभागाने संयुक्तपणे राबवावा व त्याबाबत जनजागृतिकरून अशा मोटार वाहनावर कडक कारवाही करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

(एम.एम. सिडाम)
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.